**<u>एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम - ४</u>**
**शासन सेवेतील गट-ब मधील पदासाठी शिफारसप्राप्त ठरलेल्या उमेदवारांना परिवीक्षाधीन प्रशिक्षणासाठी नियुक्ती देण्याबाबत....**

## महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग
कार्यालयीन आदेश क्रमांक : टिआरएन-१०१७/ प्र.क्र.६५ /सीपीटीपी-अ
हुतात्मा राजगुरु चौक, मदाम कामा रोड,मंत्रालय,
मुंबई-४०००३२.
दिनांक : ०६ नोव्हेंबर, २०१७

वाचा : १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. टिआरएन-२०१३/प्र.क्र. ८४/१३/१२-अ, दिनांक २० जानेवारी, २०१४.
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. टिआरएन-०५१७/प्र.क्र.३६/सीपीटीपी, दिनांक २१/०७/२०१७
३. शासन पत्र सामान्य प्रशासन विभाग क्रमांक ०६१७/प्र.क्र.६८/सीपीटीपी-ब, दिनांक २९/०६/२०१७
४. शासन पत्र सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-०६१७/प्र.क्र.६८/सीपीटीपी-ब, दिनांक १७/०७/२०१७

### <u>कार्यालयीन आदेश</u>

राज्यसेवा (मुख्य) परीक्षा-२०१६ च्या अंतिम निकालान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शासन सेवेतील गट-ब मधील पदासाठी शिफारस केलेल्या उमेदवारांना उपरोक्त वाचा येथील अनुक्रमांक ३ च्या पत्रान्वये तसेच सीपीटीपी-३ च्या प्रशिक्षणास रुजू होण्यास मुदतवाढ दिलेल्या उमेदवारांना वाचा येथील अनुक्रमांक ४ च्या पत्रान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-४ करीता तात्पुरत्या नियुक्तीचे पत्र देण्यात आले आहे. या उमेदवारांपैकी आणि यापूर्वीच्या राज्यसेवा परीक्षेमध्ये शिफारसप्राप्त ठरलेल्या, पुढील तक्त्यातील उमेदवारांची रकाना ५ मध्ये दर्शविलेल्या पदावर त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून दोन वर्षांच्या परिविक्षाधीन प्रशिक्षणासाठी परिविक्षा कालावधीवर या आदेशामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येत आहे.

| अ. क्र | नाव | राज्यसेवा परीक्षा | गुणवत्ता क्र. | संवर्ग | रुजू दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री.प्रसादकुमार किसनराव सांगळे | २०१५ | १ | कक्ष अधिकारी, गट-ब | ३०/०७/२०१७ |
| २ | श्री.महावीर बाळासाहेब झेंडगे | | ६ | कक्ष अधिकारी, गट-ब | ३१/०७/२०१७ |
| ३ | श्री.नरेश मनोहर पतंगे | | १० | कक्ष अधिकारी, गट-ब | ३१/०७/२०१७ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | श्रीमती पूजा प्रभाकर डोंगापुरे | | १८ | कक्ष अधिकारी, गट-ब | ३०/०७/२०१७ |
| ५ | श्री. सचिन रंगनाथ इंगळे | | २० | कक्ष अधिकारी, गट-ब | ३१/०७/२०१७ |
| ६ | श्रीमती सपना मच्छिंद्र भगत | | २२ | कक्ष अधिकारी, गट-ब | २९/०७/२०१७ |
| ७ | श्री. जयसेन जयप्रकाश इंगोले | | ३१ | कक्ष अधिकारी, गट-ब | ३१/०७/२०१७ वैद्यकीय तपासणीच्या अधीन राहून |
| ८ | श्रीमती श्वेता श्यामराव सावदेकर | | ३६ | कक्ष अधिकारी, गट-ब | ३१/०७/२०१७ |
| ९ | श्री. अमोल भिमराज उगलमुगले | २०१६ | १ | कक्ष अधिकारी, गट-ब | २९/०७/२०१७ |
| १० | डॉ.रविंद्र गोरख भराटे | | ३ | कक्ष अधिकारी, गट-ब | २९/०७/२०१७ |
| ११ | श्री. अर्जुन अशोक गिऱ्हाम | | ६ | कक्ष अधिकारी, गट-ब | २९/०७/२०१७ |
| १२ | श्री. प्रविण ज्ञानोबा कोतमे | | ९ | कक्ष अधिकारी, गट-ब | २९/०७/२०१७ |
| १३ | श्री. तुषार दिलीप राठोड | | १० | कक्ष अधिकारी, गट-ब | २९/०७/२०१७ |
| १४ | श्रीमती अस्मिता गोपाळ जगताप | | १४ | कक्ष अधिकारी, गट-ब | ०८/०९/२०१७ विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायानुसार |
| १५ | श्रीमती पठान अंजुमबानो रशीदखान | | १७ | कक्ष अधिकारी, गट-ब | २८/०८/२०१७ विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायानुसार |
| १६ | कु.स्नेहा अजित चुरी | | १९ | कक्ष अधिकारी, गट-ब | ३१/०७/२०१७ |
| १७ | श्री. अजित रमेश जगताप | २०१६ - अत्युच्च गुणवत्ता-धारक खेळाडू | २० | कक्ष अधिकारी, गट-ब | ३०/०७/२०१७ क्रीडा प्रमाणपत्र तपासणीच्या अधीन राहून |
| १८ | श्री. निखिल लालासाहेब गावंडे | २०१५ | ९ | सहायक गट विकास अधिकारी, गट-ब | २९/०७/२०१७ |
| १९ | श्री. केशव शेषराव मस्के | २०१६ | ७ | सहाय्यक निबंधक, गट-ब | २९/०७/२०१७ वैद्यकीय तपासणीच्या अधीन राहून |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २० | डॉ.सौरभ मनोहर तुपकर | २०१५ | २ | उप अधिक्षक भुमि अभिलेख, गट-ब | २९/०७/२०१७ |
| २१ | श्री. अविनाश एकनाथ मिसाळ | | ४ | उप अधिक्षक भुमि अभिलेख, गट-ब | ३०/०७/२०१७ |
| २२ | श्री. ज्ञानेश्वर प्रल्हादराव घ्यार | २०१६ | १ | उप अधिक्षक भुमि अभिलेख, गट-ब | २९/०७/२०१७ |
| २३ | श्री. आदित्य गोविंद पवार | २०१५ | १ | उप अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क, गट-ब | २९/०७/२०१७ |
| २४ | श्री. हर्षवर्धन बाळकृष्ण शिंदे | २०१६ | १ | उप अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क, गट-ब | २९/०७/२०१७ |
| २५ | श्री. विश्वजित अरुण देशमुख | | २ | उप अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क, गट-ब | २९/०७/२०१७ |
| २६ | डॉ. प्रिया वसंतराव देहेडकर | २०१५ | २ | सहाय्यक आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, गट-ब | २९/०७/२०१७ |
| २७ | श्री.अतुल अंकुश जगताप | २०१५ | १ | नायब तहसिलदार, गट-ब | ३१/०७/२०१७ |
| २८ | श्री.अविनाश लहानु कोरडे | | ८ | नायब तहसिलदार, गट-ब | २९/०७/२०१७ |
| २९ | डॉ. निकेतन भगवंतराव वाळे | | ११ | नायब तहसिलदार, गट-ब | २९/०७/२०१७ |
| ३० | श्री. नाथाजी शहाजी पाटील | | १२ | नायब तहसिलदार, गट-ब | २९/०७/२०१७ |
| ३१ | श्री. सुजित कैलास वाबळे | | १७ | नायब तहसिलदार, गट-ब | ३१/०७/२०१७ |
| ३२ | श्री.विक्रांत बाळासाहेब मोंढे | | १८ | नायब तहसिलदार, गट-ब | २९/०७/२०१७ |
| ३३ | डॉ. बाळू सुभाष दराडे | | २८ | नायब तहसिलदार, गट-ब | ३०/०७/२०१७ साक्षांकन नमुना तपासणीच्या अधीन राहून |
| ३४ | श्री. अनमोल रजनीश कांबळे | | २९ | नायब तहसिलदार, गट-ब | २९/०७/२०१७ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३५ | श्रीमती प्रियंका माणिकराव मानकर | | ३२ | नायब तहसिलदार, गट-ब | २९/०७/२०१७ |
| ३६ | श्री.महेश सुभाष हांडे | २०१६ | २ | नायब तहसिलदार, गट-ब | २९/०७/२०१७ |
| ३७ | श्री. संतोष रावसाहेब मुंडे | | ४ | नायब तहसिलदार, गट-ब | २९/०७/२०१७ |
| ३८ | श्री. विकास सारंगधर राणे | | ५ | नायब तहसिलदार, गट-ब | २९/०७/२०१७ |
| ३९ | श्री. विशाल विश्वासराव दशवंत | २०१६ | २ | उप शिक्षणाधिकारी, गट-ब | २९/०७/२०१७ |
| ४० | श्री. निखिल शदर भुयार | | ४ | उप शिक्षणाधिकारी, गट-ब | २९/०७/२०१७ |
| ४१ | श्री. सचिन नानाजी सोळंकी | | ५ | उप शिक्षणाधिकारी, गट-ब | २९/०७/२०१७ |
| ४२ | कु. रत्नमाला राजेंद्र गायकवाड | | ८ | उप शिक्षणाधिकारी, गट-ब | २९/०७/२०१७ |
| ४३ | श्री. कुनालकुमार नामदेव कन्नाक | | ११ | उप शिक्षणाधिकारी, गट-ब | ३१/०७/२०१७ वैद्यकीय तपासणीच्या अधीन राहून |
| ४४ | श्री. रविंद्र आबासो सावंत | २०१६ अत्युच्च गुणवत्ता-धारक खेळाडू | १२ | उप शिक्षणाधिकारी, गट-ब | ३१/०७/२०१७ वैद्यकीय तपासणी व क्रीडा प्रमाणपत्र तपासणीच्या अधीन राहून |
| ४५ | श्री. अनंता चंद्रशेखर जोशी | २०१५ | १ | सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब | २९/०७/२०१७ |
| ४६ | श्री. शैलेश श्रीनिवासजी लाहोटी | | ४ | सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब | २९/०७/२०१७ |
| ४७ | श्री. सिध्दार्थ विजयसिंह ठाके | | ७ | सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब | २९/०७/२०१७ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४८ | कु. राजश्री तानाजी गुंड | | ११ | सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब | ३०/०७/२०१७ |
| ४९ | श्री. हर्षल नामदेव डाके | २०१६ | १ | सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब | २९/०७/२०१७ |

**परिवीक्षाधीन कालावधीवरील नियुक्तीच्या अटी व शर्ती:-**

१. उमेदवाराची नियुक्ती दिनांक ०१/०८/२०१७ पासून एकत्रित परिवीक्षा प्रशिक्षणासाठी दोन वर्षाच्या परिवीक्षा कालावधीसाठी राहील.

२. उमेदवाराने रुजू होतांना दिलेल्या रु. ३ लाख रकमेच्या बंधपत्रातील तरतूदी त्याच्यावर बंधनकारक असतील.

३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि. २१/०७/२०१७ अन्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्यसेवा परीक्षेमार्फत निवड झालेल्या उमेदवारांना एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत गट-अ व गट-ब मधील परिविक्षा अधिकाऱ्यांना प्रशासनातील कामकाजास पुरक ठरेल असा मुंबई विद्यापीठातर्फे दोन वर्षे (Master of Arts in Development Administration -M.A.(D. Adm) with Specialization) या दोन वर्षाच्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश अर्हता देण्यात आला असून एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षणास रुजू होणाऱ्या सर्व परिविक्षाधीन अधिकाऱ्यांना सदर दोन वर्षाचा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम विद्यापीठाच्या प्रचलित नियमानुसार उत्तीर्ण होणे बंधनकारक असेल.

४. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने शासन, यशदा व मुंबई विद्यापीठ यांचेकडून वेळोवेळी दिलेल्या सूचना/नियम/ आदेश/ निर्णय बंधनकारक राहतील.

५. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमानुसार चारही सत्रांच्या परीक्षा विहित संधी/ कालावधीत उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील. तसेच सर्व टप्प्यांचे प्रशिक्षणही ०२ वर्षाचा परिविक्षा कालावधीत पूर्ण करणे बंधनकारक राहील.

६. उमेदवाराने एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम समाधानकारकरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील. तसेच शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक टिआरएन-२०१७/प्र.क्र. ४७/१७/सीपीटीपी, दि.२६.०७.२०१७ नुसार त्यांच्या दोन वर्षाच्या परिवीक्षा कालावधीतील पहिल्या १४ आठवड्यांसाठी **रु.२०,०००/-(रु.वीस हजार फक्त)** याप्रमाणे ठोक वेतन अनुज्ञेय राहील. तद्नंतर संबंधित विभागाकडे तांत्रिक प्रशिक्षणाच्या टप्प्यासाठी हजर झाल्यावर या परिवीक्षाधीन अधिकाऱ्यांचे नियमित वेतन व १४ आठवड्यांच्या कालावधीत अदा करण्यात आलेली ठोक वेतनाची रक्कम यामधील फरकाची रक्कम, संबंधित प्रशासकीय विभागाकडून एकरकमी अदा करण्यात येईल.

७. उमेदवारांनी दोन वर्षांचा परिवीक्षा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण करणे व या कालावधीत त्यांची वर्तणूक समाधानकारक व त्यांच्या पदाला अनुरुप असणे आवश्यक

राहील. त्यांनी परिवीक्षा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण न केल्यास किंवा त्यांची वर्तणूक समाधानकारक व त्यांच्या पदाला अनुरुप नसल्याचे तसेच परिविक्षाधीन पदावरील गैरवर्तणुकीची/ गैरव्यवहाराची बाब सदर परिवीक्षा कालावधीत निदर्शनास आल्यास, अथवा इतर कारणांमुळे ते या पदासाठी योग्य नसल्याचे आढळून आल्यास, कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांच्या सेवा समाप्त करण्यात येतील.

८. उमेदवारांची नियुक्ती त्यांच्या चारित्र्य पडताळणीच्या अधीन राहून करण्यात येत आहे. या पदावरील नियुक्तीपूर्वी शासन सेवेतील पदावर कार्यरत असल्यास व त्या पदावरील गैरवर्तणुकीची/ गैरव्यवहाराची बाब सदर परिवीक्षा कालावधीत निदर्शनास आल्यास, कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची परिवीक्षाधीन पदावरील नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

९. उमेदवारांनी सदर पदावरील नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या कालावधीत महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने विहित केल्यानुसार संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. सदर प्रमाणपत्र विहित कालावधीत धारण न केल्यास त्यांच्या सेवा समाप्त करण्यात येतील.

१०. उमेदवारांना मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसल्यास एतदर्थ मंडळाची मराठी व हिंदी भाषा परीक्षा दोन वर्षाच्या अवधीत उत्तीर्ण करणे आवश्यक राहील, अन्यथा त्यांच्या सेवा समाप्त करण्यात येतील.

११. ज्या उमेदवारांची निवड मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदावर झाली आहे आणि ज्या उमेदवारांनी संबंधित मागास प्रवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही, अशा उमेदवारांना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दि.१२.१२.२०११ मधील तरतूदीनूसार त्यांच्या जात प्रमाणपत्राच्या वैधता तपासणीच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येत आहे. अशा उमेदवारांनी नियुक्तीपासून ६ महिन्यांच्या आत त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीत जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील. जात पडताळणी समितीने त्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर त्यांची नियुक्ती तात्काळ संपुष्टात आणण्यात येईल आणि अशा उमेदवाराविरुध्द महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्गीय व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन ) अधिनियम, २००० मधील तरतूदींनुसार योग्य ती पुढील कार्यवाही करण्यात येईल.

१२. उमेदवारांना “नवीन निवृत्तीवेतन योजना” (New Pension Scheme) लागू राहील. मात्र दिनांक १ नोव्हेंबर,२००५ पूर्वी शासन सेवेत निवृत्तीवेतनार्ह आस्थापनेवर नियमित स्वरुपात नियुक्त झालेल्या उमेदवारांना शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक अनियो-१००६/८७/सेवा-४, दिनांक १२.०१.२००७ मधील अटींच्या पूर्ततेच्या अधीन राहून, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू राहतील.

१३. उपरोक्त अटीं व्यतिरिक्त महाराष्ट्र शासनाच्या अधिका-यांना लागू असलेल्या सर्व महाराष्ट्र नागरी सेवा नियमांचे व इतर सेवाविषयक सर्वसाधारण नियमांचे पालन बंधनकारक राहील. तसेच यापुढे वेळोवेळी शासन जे आदेश देईल त्या आदेशांचे पालन करणेही त्यांना बंधनकारक राहील.

१४. ज्या उमेदवारांची नियुक्ती आरक्षित पदांवर झाली आहे, अशा उमेदवारांचे नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र, अपंगत्व प्रमाणपत्र, क्रीडा प्रमाणपत्र इत्यादी संबंधित प्रमाणपत्र पडताळणीच्या अधीन राहून नियुक्त करण्यात येत आहे.

१५. एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत परिविक्षाधीन अधिकाऱ्यांना ०२ वर्षाचे प्रशिक्षण दिले जाते. सबब इतर राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागू असलेले महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू असले तरी त्यांच्या रजांच्या बाबतीत सामान्य प्रशासन विभागाकडून दिलेले आदेश लागू राहतील. परिविक्षाधीन अधिकारी अनाधिकृतरित्या गैरहजर राहिल्यास तसेच वैद्यकीय कारणाच्या सबबीखाली राज्य लोकसेवा/ केंद्रीय लोकसेवा परीक्षांची तयारी/ परीक्षा देत असल्याचे निदर्शनास आल्यास सबंधित परिविक्षाधीन अधिकाऱ्याच्या सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यात येईल.

१६. उपरोक्त अटींव्यतिरिक्त शासनास आवश्यक वाटतील अशा आणखी अटीही शासन घालु शकेल व त्या अटी उमेदवारावर बंधनकारक असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्र.ज.मुळे)
**अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग.**

प्रती-

१. प्रधान महालेखापाल (ले.व अ.)/(लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
२. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
३. कुलगुरु, मुंबई विद्यापीठ
४. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, महसूल व वन विभाग/ गृह विभाग (परिवहन व राज्य उत्पादन शुल्क)/नगर विकास विभाग/ग्राम विकास विभाग/ सहकार, वस्त्रोद्योग व पणन विभाग मंत्रालय, मुंबई.
५. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
६. संचालक,वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, व्हीआयपी रोड, धरमपेठ, नागपूर- ४४० ०१०.
७. सह सचिव/उप सचिव, (आस्थापना- कक्ष अधिकारी, गट ब ),(कार्यासन १४-ब),सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. सह सचिव/उप सचिव, (आस्थापना-कक्ष अधिकारी, गट-ब), महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
९. सह सचिव/उप सचिव, (आस्थापना-सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब), गृह विभाग (परिवहन), मंत्रालय, मुंबई.
१०. सह सचिव/उप सचिव, (आस्थापना- सहायक गट विकास अधिकारी, गट-ब), ग्रामविकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, मुंबई.

११. सह सचिव/उप सचिव, (आस्थापना- सहायक निबंधक सहकारी संस्था, गट-ब),सहकार वस्त्रोउद्योग व पणन, मंत्रालय, मुंबई.
१२. सह सचिव/उप सचिव, (आस्थापना- उप अधिक्षक भूमी अभिलेख, गट-ब),महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. सह सचिव/उप सचिव (आस्थापना- नायब तहसिलदार, गट-ब), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. सह सचिव/उप सचिव, (आस्थापना- उप अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट-ब), गृह विभाग (राऊशु), मंत्रालय, मुंबई.
१५. सह सचिव/उप सचिव
१६. संबंधीत उमेदवार (वनामती, नागपूर या प्रशिक्षण संस्थेमार्फत).
१७. वैयक्तिक नस्ती-कार्यासन साप्रवि,सीपीटीपी-ब